# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**सन २०२५-२६ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६**

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ८**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: ई-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०२, सर्वसाधारण शिक्षण**<br>**बाब क्रमांक: ४०, रूपये:- २,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (१) | ११०८ | १० | सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यामध्ये ३८४ प्राथमिक शाळा असून या शाळांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी तसेच शाळेमधील सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्हीची व्यवस्था असणे, पायाभूत सुविधा उपलब्ध असणे आवश्यक असल्याने सांगोला तालुक्यातील ३८४ प्राथमिक शाळा पीएम श्री प्राथमिक शाळा विकसित करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अनंत (बाळा) नर** |
| (२) | १०९४ | १०० | जोगेश्वरी पूर्व मधील मौजे मजास येथील न.भू.क्र २२/२३ या जागेवर अत्याधुनिक ग्रंथालय सुरू करण्यासाठी आरक्षित जागेचे अधिग्रहण व हस्तांतरण करुन नगर विकास विभाग आणि मुंबई महानगरपालिका (BMC) यांच्या समन्वयाने सदर जागा शालेय शिक्षण विभागाकडे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया तातडीने पुर्ण करावी,सदर ग्रंथालयात केवळ पुस्तके न ठेवता ते ‘डिजिटल हब’ म्हणून विकसित करावे. यात हाय-स्पीड इंटरनेट, वाय-फाय सुविधा, ई-रिडर्स (Kindle) आणि कॉम्प्युटर लॅबची व्यवस्था करावी, जेणेकरून विद्यार्थ्यांना National Digital Library of India मधील साहित्याचा लाभ घेता येईल.व जोगेश्वरी परिसरातील गरजू विद्यार्थ्यांसाठी या ग्रंथालयात स्वतंत्र स्पर्धा परीक्षा (MPSC/UPSC) विभाग सुरू करावा. तेथे दर्जेदार संदर्भ ग्रंथ आणि २४ तास सुरू राहणारी वातानुकूलित अभ्यासिका उपलब्ध करून द्यावी. त्याकरिता या प्रकल्पाच्या बांधकामासाठी आणि तांत्रिक साहित्यासाठी जिल्हा नियोजन समिती (DPDC) किंवा शालेय शिक्षण विभागाच्या ‘ग्रंथालय संचालनालय’ योजनेतून स्वतंत्र निधी मंजूर करावा, ग्रंथालयाला ई-बालभारती (eBalbharati) च्या पोर्टलशी जोडून शालेय विद्यार्थ्यांना ऑडिओ-व्हिज्युअल शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करावी व ग्रंथालयाच्या संचलनासाठी प्रशिक्षित ग्रंथपाल आणि तांत्रिक सहाय्यकांची पदे मंजूर करून त्याद्वारे स्थानिक तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध होईल त्यादृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (३) | १०७९ | १० | राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये बहुतांश ठिकाणी स्वतंत्र क्रीडा शिक्षक कार्यरत नाहीत. माध्यमिक शाळांमध्येही हजारो क्रीडा शिक्षकांची पदे रिक्त आहेत. परिणामी विद्यार्थ्यांना नियमित क्रीडा प्रशिक्षण, शारीरिक शिक्षण व स्पर्धात्मक तयारी मिळत नाही. जिल्हा परिषद केंद्र शाळांसाठी सुमारे ४,८६० क्रीडा शिक्षक पदांना मंजुरी देण्यात आल्याचे सांगितले जाते, परंतु त्या मंजूर पदांवर अद्याप ठोस भरती प्रक्रिया सुरू झालेली नाही. नवीन व जुनी रिक्त पदे भरण्याबाबत शासनाचे स्पष्ट व वेळबद्ध धोरण अद्याप जाहीर झालेले नाही. क्रीडा क्षेत्रात महाराष्ट्राची परंपरा समृद्ध आहे. ग्रामीण भागात मोठी प्रतिभा आहे, परंतु प्रशिक्षित क्रीडा शिक्षकांच्या अभावामुळे ती संधी गमावली जात आहे. म्हणून माझी शासनाकडे ठाम मागणी आहे की प्राथमिक व माध्यमिक विभागातील सर्व रिक्त क्रीडा शिक्षक पदांची तात्काळ जिल्हानिहाय यादी जाहीर करावी. पवित्र पोर्टलद्वारे सर्व नवीन व रिक्त पदे निश्चित कालमर्यादेत भरावीत. प्रत्येक जिल्हा परिषद केंद्र शाळेत किमान एक क्रीडा शिक्षक नियुक्त करणे बंधनकारक करावे. माध्यमिक शाळांमधील प्रलंबित पदभरती ३ ते ६ महिन्यांच्या आत पूर्ण करावी. क्रीडा शिक्षक पदभरतीसाठी स्वतंत्र शासन निर्णय (GR) जाहीर करून स्पष्ट धोरण मांडावे. वरील मागण्यांची पूर्तता न झाल्यास शिक्षण विभागाच्या संबंधित पुरवणी मागणीतील तरतुदीवर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: ई-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०२, सर्वसाधारण शिक्षण**<br>**बाब क्रमांक: ४२, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. सुनिल प्रभू** |
| (४) | १०४४ | १० | जि.सिंधुदुर्ग ता. दोडामार्ग घोटगे-परमे येथील श्री.धारेश्वर माध्यमिक विद्यालयाची सन २००४-२००५ ते २००७-२००८ या तीन वर्षाच्या कालावधीचे टप्पा अनुदान व त्यांनतर मार्च-२००९ ते डिंसेबर-२०१४ या कालावधीतील नियमित थकीत वेतन अनुदान रक्कम अद्यापपर्यंत देण्यात आली नसल्याचा गंभीर प्रकार नुकताच निदर्शनास येणे, तसेच सदर शाळेच्या समायोजन न झालेल्या २ शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे माहे, जुलै-२०१८ पासून ते जानेवारी, २०२६ पर्यंतचे थकीत वेतन रक्कम, शिक्षण अधिकारी (माध्यमिक) सिंधुदुर्ग जिल्हा परिषद यांनी श्री.धारेश्वर माध्यमिक विद्यालयास उपलब्ध करुन न देता थकित ठेवण्यात येणे, यामुळे सदरहू विद्यालयास शाळा चालविणे आर्थिक दृष्ट्या अंत्यत कठीण होणे, परिणामी विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर परिणाम होण्याची शक्यता असणे, सदरहू उक्त विद्यालयाची विविध टप्प्यातील थकीत अनुदान रक्कम मिळणेबाबत व |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | समायोजनाबाबत मुख्याध्यापिका अस्मिता दळवी यांनी दि.२४.११.२०२५ व यापुर्वी अनेकवेळा शिक्षणधिकारी, सिंधुदुर्ग जिल्हा परिषद यांना लेखी पत्र देऊनही, अद्याप यावर कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (५) | १०७८ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघातील उच्च प्राथमिक शाळांच्या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. उमरेड मतदारसंघातील अनेक ग्रामीण व दुर्गम भागात इयत्ता ५ वी ते ८ वी पर्यंतच्या उच्च प्राथमिक शाळा स्थानिक संस्थांनी व शिक्षण मंडळांनी सुरू केलेल्या आहेत. परंतु या शाळांना अद्याप पूर्ण शासकीय मान्यता किंवा नियमित अनुदान/मानधन मिळत नसल्यामुळे शिक्षकांना अत्यल्प मानधनावर काम करावे लागत आहे. काही ठिकाणी शिक्षकांना अनेक महिने वेतन मिळत नाही. याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षणासाठी दूर अंतरावर जावे लागते. उच्च प्राथमिक शाळांना योग्य मान्यता व निधी मिळाल्यास शिक्षण गळती कमी होईल व विद्यार्थ्यांना त्यांच्या गावातच दर्जेदार शिक्षण मिळू शकेल. म्हणून माझी शासनाकडे ठाम मागणी आहे की उमरेड मतदारसंघातील सर्व उच्च प्राथमिक शाळांची तात्काळ तपासणी करून प्रलंबित मान्यता प्रस्ताव मंजूर करण्यात यावेत. पात्र शाळांना नियमित शासकीय अनुदान/मानधन देण्यात यावे. शिक्षकांचे प्रलंबित मानधन तात्काळ अदा करण्यात यावे. ग्रामीण भागातील उच्च प्राथमिक शिक्षण बळकट करण्यासाठी विशेष निधीची तरतूद पुरवणी मागणीत करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | १०८९ | १० | माझ्या उमरेड विधानसभा मतदारसंघा मध्ये माझ्या व जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद नागपूर यांच्या पुढाकाराने कुही तालुक्यातील म्हसली या गावात क्लस्टर शाळा उभारण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. ही अत्यंत स्तुत्य आणि दूरदृष्टीची भूमिका आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना आधुनिक सुविधा, सक्षम शिक्षकवर्ग आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध होणार आहे. परंतु, प्रश्न असा आहे की जर ही संकल्पना एका गावासाठी योग्य असेल, तर राज्यातील इतर दुर्गम, आदिवासी, डोंगराळ व ग्रामीण भागातील गावांसाठी ती का लागू करू नये? आजच्या स्पर्धेच्या युगात:गुणवत्तापूर्ण शिक्षण, अद्ययावत अभ्यासक्रम, डिजिटल सुविधा, विज्ञान प्रयोगशाळा, क्रीडा व कौशल्य विकास, ही केवळ शहरातील विद्यार्थ्यांची मक्तेदारी राहू नये. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही समान संधी मिळणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे माझी शासनाकडे विनंती आहे की राज्यातील सर्व दुर्गम भागातील जिल्हा परिषद शाळांचे सर्वेक्षण करून त्यांना क्लस्टर शाळा म्हणून विकसित करावे.आवश्यक असल्यास विशेष निधीची तरतूद करावी.तात्काळ उपाययोजना (Intervention Measures) राबवून पायाभूत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | सुविधा मजबूत कराव्यात. शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरावीत. प्रत्येक मोठ्या ग्रामपंचायतीत किमान एक आदर्श क्लस्टर शाळा उभारण्याचे धोरण जाहीर करावे, ही विनंती. आज ग्रामीण विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा पाया मजबूत करणे ही केवळ शैक्षणिक गरज नसून सामाजिक व आर्थिक विकासाची पूर्वअट आहे. जर आपण आज योग्य निर्णय घेतला नाही, तर ग्रामीण आणि शहरी शिक्षणातील दरी अधिक वाढेल. त्यामुळे मी शासनास आवाहन करतो की, या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन राज्यव्यापी क्लस्टर शाळा धोरण जाहीर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | १०९० | १० | विदर्भातील भंडारा, गोंदिया, नागपूर, चंद्रपूर, वर्धा, गडचिरोलीया जिल्ह्यांतील नगर परिषद, प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षकांचे वरिष्ठ व निवड श्रेणी पदोन्नती वेतन, पदवीधर वेतनश्रेणी, सेवानिवृत्ती उपदान, भविष्य निर्वाह निधी अंतिम देयके तसेच शिक्षण सेवकांची देयके अशी सुमारे ३९ कोटी रुपयांची थकबाकी शिक्षण उपसंचालक कार्यालय, नागपूर येथे २०२२ पासून प्रलंबित असल्याचे दि. २३/०२/२०२६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे. याबाबत संबंधित शिक्षक व विविध शिक्षक संघटनांनी वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून समाधानकारक दखल घेण्यात आलेली नाही. परिणामी, संतप्त शिक्षकांनी दि. १६/०२/२०२६ पासून शिक्षण उपसंचालक कार्यालय, नागपूर येथे बेमुदत साखळी उपोषण सुरू केले आहे. सहा दिवस उलटूनही शासनाकडून ठोस प्रतिसाद न मिळाल्याने शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष व नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे विदर्भातील वरील जिल्ह्यांतील शिक्षकांची सुमारे ३९ कोटी रुपयांची थकबाकी प्रलंबित असल्याचे शासनाच्या निदर्शनास आहे काय ही थकबाकी २०२२ पासून प्रलंबित राहण्यामागील नेमकी कारणे कोणती? संबंधित शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून झालेल्या विलंबाबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, आंदोलन करणाऱ्या शिक्षकांशी शासनाने चर्चा केली नाही तसेच प्रलंबित देयके अदा करण्यासाठी शासन कोणती तातडीची कार्यवाही करीत आहे, सर्व थकबाकी देयके अदा करण्यासाठी निश्चित कालमर्यादा काय आहे त्यामुळे माझी शासनाकडे मागणी आहे की शासनाने तात्काळ विशेष निधी उपलब्ध करून देऊन सर्व प्रलंबित देयके अदा करावीत व भविष्यात अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभारण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: ई-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०२, सर्वसाधारण शिक्षण**<br>**बाब क्रमांक: ४३, रूपये:- ३,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (८) | ११०६ | १० | सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यामध्ये सांगोला नगरपालिका हद्दीत १९ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तर एक उर्दू शाळा सुरू आहे. सदर जिल्हा परिषद प्राथमिक |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | शाळा या जिल्हा परिषद सोलापूर यांच्या नियंत्रणाखाली असून या शाळांचे हस्तांतरण सांगोला नगर पालिका यांच्याकडे करण्याची आवश्यकता आहे सदर शाळांचे हस्तांतर झाल्यास शाळेच्या देखभाल व दुरुस्ती खर्च तसेच इतर प्रशासकीय कामकाजासाठी नगरविकास विभागाकडून असणाऱ्या योजनांचा लाभ या शाळांना घेता येईल तरी सांगोला नगरपालिका हद्दीत १९ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व एक उर्दू शाळेच्या हस्तांतरणाची प्रक्रिया जिल्हा परिषद सोलापूर यांच्याकडून सांगोला नगर पालिका यांच्याकडे करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २६ फेब्रुवारी, २०२६**

**डॉ.विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई